आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल अॅप!
अॅप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

पान ३
जिल्हा परिषद राज्यात तिसरी
नीट परीक्षेसाठी नाशकात दहा हजारांवर विद्यार्थी
तिकीट तपासणीतून अकरा कोटींचा महसूल
पान ८
प्रवासी वाहनांत सर्रास घरगुती गॅस
परमिट रुम लक्ष करणारा कुट्टी ताब्यात
गंगापूररोडच्या गुंडगिरीला चाप

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ | अंक २३७ | सोमवार, दि. ५ मे २०२५ | पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## संपादकीय

### पर्यटनपूरक पाऊल


दिवस उन्हाळी पर्यटनाचे आहेत. तसेही अलीकडच्या काळात पर्यटनाला चांगले दिवस आले आहेत. परिणामी तिन्ही ऋतूत कुठल्या ना कुठल्या ठिकाणी पर्यटनप्रेमींचे पर्यटन सुरूच असते. ते अधिक सुरक्षित आणि सुखदायी व्हावे, अशीच पर्यटकांची अपेक्षा असते. त्याच उद्देशाने 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल' तथा 'पर्यटन मित्र' स्थापन करण्याचा निर्णय सरकारने नुकताच जाहीर केला आहे. पर्यटकांची सुरक्षा हा त्यामागचा प्रमुख उद्देश असल्याचे आणि त्या बरोबरीने पर्यटनस्थळांविषयी माहिती पुरवण्याचे काम हे मित्र करतील, असेही सरकारकडून सांगण्यात आले. पर्यटन हा जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. एकदा तरी फिरायला जाण्याची प्रत्येकाची इच्छा असतेच. पर्यटनातून रोजगार निर्मिती होते. राज्याच्या अर्थव्यवस्थेत भर पडते. अनेकांना उदरनिर्वाहासाठी संधी निर्माण होते. म्हणून पर्यटन सुरक्षित आणि सुखदायी व्हावे ही काळाची गरज मानता येईल. पर्यटकांना होणाऱ्या अपघातांमुळे अनेक ठिकाणे बदनाम मानली जातात. नैसर्गिक आपत्तींमुळे अपघात होऊ शकतात. तथापि बऱ्याचदा पर्यटकांचा अतिउत्साह त्यांच्या अंगाशी आल्याचे दिसते. 'काही होत नाही..' अशी बेफिकिरी दाखवली जाते. सेल्फी काढणे, रिल्स बनवणे, निसरड्या किंवा पाण्याच्या ठिकाणी अनाठायी धाडस करणे; प्रसंगी जीवाशी खेळ ठरू शकते. तशा घटना अधूनमधून घडतात. सरकारच्या नियोजित उपक्रमातील 'पर्यटन मित्र' तो धोका पर्यटकांच्या लक्षात आणून देऊ शकतील. प्रसंगी अटकाव करण्याचा प्रयत्न करू शकतील. अर्थात त्यांचे प्रयत्न प्रभावी ठरणे पर्यटकांच्याच सहकार्यावर अवलंबून असेल. अनेक पर्यटनस्थळी धोक्याच्या सूचना देणारे फलक लावलेले असतात. स्थानिक लोक सूचना करतात. किती पर्यटक ते मनावर घेतात? तेव्हा, अशा पुढाकारामागचा उद्देश पर्यटकांनी लक्षात घेण्याची गरज आहे. पर्यटनस्थळांची माहिती सर्वांना असतेच असे नाही. सर्वच ठिकाणी मार्गदर्शकांची सुविधा उपलब्ध असू शकेल असे नाही. ती उणीव सरकारी 'पर्यटन मित्र' दूर करू शकतील. अनेकदा पर्यटनस्थळीदेखील उणीवा असू शकतात. पर्यटकांची काही निरीक्षणे किंवा तक्रारी देखील असू शकतील. अनेक पर्यटक अनुभवी आणि प्रशिक्षित असतात. त्यांच्याकडे अनुभवांचा खजिना असतो. अशा बाबतीत पर्यटन मित्र सरकार आणि पर्यटक यांच्यातील ते दुवा ठरू शकतील. पर्यटनासंबंधीचा सरकारचा हा निर्णय तातडीने अमलात यावा, अशीच पर्यटकांची अपेक्षा असेल.

# पाकिस्तानला धक्क्यांवर धक्के

## पहलगाम हल्ल्यानंतर कठोर पावले; भारताकडून चहुबाजूंनी कोंडी

नवी दिल्ली | वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव शिगेला पोहोचला आहे. पाकविरोधात भारताकडून कठोर पावले उचलली जात आहेत. पाकिस्तानची चहुबाजूंनी कोंडी करण्याची रणनीती आखण्यात येत आहे. आज भारताने आणखी दोन महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन पाकिस्तानला धक्क्यांवर धक्के दिले. चिनाब नदीवरील बागलीहार प्रकल्पाचे पाणी अडवण्याचा निर्णय भारताकडून घेण्यात आला आहे. यासोबतच पाकिस्तानातील दोन बड्या वाचाळ नेत्यांना भारताने झटका दिला. पाकिस्तान पीपल्स पार्टीचे अध्यक्ष बिलावल भुट्टो झरदारी आणि माजी पंतप्रधान इम्रान खान यांची 'एक्स' समाज माध्यमावरील खाती भारतात बंद करण्यात आली आहेत.



### बागलीहार प्रकल्पाचे पाणी अडवणार

पहलगामवरील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला त्याची जागा दाखवण्यासाठी सर्व बाजूंनी मुस्कटदाबी सुरू केली आहे. सिंधू पाणीवाटप करार रद्द केल्यानंतर वूलर सरोवराचे पाणीही बंद करण्यात आले. आता त्यापुढे जाऊन चिनाब नदीवरील बागलीहार प्रकल्पाचे पाणीदेखील अडवण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे. पाकिस्तानसाठी हा आणखी एक मोठा धक्का मानला जात आहे.

जम्मू-काश्मीरमधील बागलीहार जलविद्युत प्रकल्प पुन्हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वादाचा केंद्रबिंदू ठरला आहे. जम्मूच्या रामबनमधील बागलीहार प्रकल्पातील पाण्याचे वहन नियंत्रित करण्याची क्षमता भारताकडे आहे. तसेच, झेलम नदीवरील किशनगंगा प्रकल्पाबाबतही भारत लवकरच कठोर निर्णय घेण्याच्या तयारीत आहे.

सिंधू पाणीवाटप करार १९६० मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती अयुब खान यांच्या पुढाकाराने करण्यात आला. या करारानुसार, रावी, बियास आणि सतलज नद्यांच्या पाण्याचे अधिकार भारताच्या नियंत्रणात देण्यात आले. तर सिंधू, चिनाब व झेलम नद्या पाकिस्तानच्या पान १० वर >>>

### हवाई दलप्रमुख- पंतप्रधान भेट

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. दोन्ही देशांदरम्यान तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. हवाई दलाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी हजर होते. पाकिस्तानसोबतच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. शनिवारी, नौदलप्रमुख अॅडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी पंतप्रधानांची भेट घेतली होती. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान पान १० वर >>>


#### भारताची क्षेपणास्त्र चाचणी

कर्नाटकच्या कारवारजवळ भारताकडून येत्या ७ मे रोजी क्षेपणास्त्र चाचणी करण्यात येणार आहे. 'आम्ही सज्ज आहोत' असे सूचित करणारी ही झलक असेल, असे मानले जात आहे. पाकिस्तानसाठी हा इशाराच ठरणार आहे. एप्रिल महिन्यात भारताने ब्रह्मोस सुपरसोनिक क्रूझ मिसाईलची चाचणी केली. भारताच्या लढाऊ विमानांनी काल उत्तर प्रदेशातील गंगा एक्स्प्रेस वेवर यशस्वीपणे नाइट लँडिंग केली. यातून हवाई दलाने भारताची ताकद दाखवली. त्यामुळे हवा, पाणी आणि जमीन अशा तिन्ही स्तरांवर भारताने पाकिस्तानला आव्हान दिले आहे.

### भुट्टो, इम्रान यांच्यावर डिजिटल स्ट्राइक

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने आज पाकिस्तानच्या दोन बड्या नेत्यांना दणका दिला. पाकिस्तान पीपल्स पार्टीचे अध्यक्ष बिलावल भुट्टो झरदारी आणि माजी पंतप्रधान इम्रान खान यांची 'एक्स' समाजमाध्यमांवरील खाती भारतात बंद करण्यात आली आहेत.





बिलावल भुट्टो झरदारी यांनी नुकतीच भारताबद्दल गरळ ओकली होती. पाकिस्तान पंतप्रधानांचे खाते दोन दिवसांपूर्वीच बंद करण्यात आले. भारताकडून पाकिस्तानविरोधातील डिजिटल स्ट्राइक अजूनही सुरूच ठेवल्याचे आजच्या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तानविरोधात अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. चोख प्रत्युत्तर देण्याची तयारी भारताने सुरू केली आहे. देशाच्या आयटी मंत्रालयाने 'एक्स' कंपनीला भारतातील पाकिस्तानी सरकारचे खाते ब्लॉक करण्यास सांगितले होते. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानशी असलेले सर्व राजनैतिक संबंध संपवणे, भारतातील पाकिस्तानच्या फेसबुक आणि यू-ट्यूब चॅनलवर बंदी घालणे, असे निर्णय घ्यायला सुरुवात केली आहे. दहशतवादी कारवायांविरुद्ध ठोस पावले उचलण्यास पाकिस्तानला भाग पाडण्यासाठी ही कारवाई सुरू झाली आहे. त्याचे पुढचे पाऊल म्हणून बिलावल भुट्टो झरदारी आणि माजी पंतप्रधान इम्रान खान यांचे ट्विटर खाते भारतात बंद करण्यात आले आहेत.

## पाकचे दोन गुप्तहेर अटकेत

अमृतसर | वृत्तसंस्था

अमृतसर ग्रामीण पोलिसांनी आज दोन पाकिस्तानी गुप्तहेरांना ताब्यात घेतले. पलक शेर मसीह आणि सूरज मसीह अशी त्या गुप्तहेरांची नावे आहेत. नावाच्या दोघांना अटक केली आहे, ज्यांच्यावर पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयचे गुप्तहेर असल्याचा आरोप आहे. हे दोन्ही गुप्तहेर अमृतसरमध्ये राहून भारतीय लष्कर आणि अमृतसर एअरबेसशी संबंधित माहिती पाकिस्तानला पुरवत होते. पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थांनी अमृतसर तुरुंगात बंद असलेल्या हरप्रीत सिंग उर्फ हॅप्पीमार्फत या संशयितांशी संपर्क साधल्याची माहिती आहे.

आरोपी सूरज मसीह आणि पलक शेर मसीह हे अमृतसरच्या बलहडवाल येथील रहिवासी आहेत. दोघे जण आयएसआयसाठी काम करीत होते, यासाठी त्यांना सिम कार्ड आणि फोन देण्यात आला होता, अशी माहिती पोलीस तपासातून पुढे आली आहे. या प्रकरणाची गांभीर्याने चौकशी केली जात आहे. दोन्ही आरोपींनी आतापर्यंत पाकिस्तानला कोणती माहिती दिली? त्यामागे त्यांचा हेतू काय होता? या कृत्यात त्यांच्यासोबत आणखी कोणाचा पान १० वर >>>

## योगगुरु शिवानंद यांचे निधन

वाराणसी | वृत्तसंस्था

येथील योगसाधक शिवानंद बाबा यांचे निधन झाले. वयाच्या १२८ व्या वर्षी योगगुरु बाबा शिवानंद यांनी अखेरचा श्वास घेतला. बाबा शिवानंद वाराणसीच्या भेलूपुरमधील दुर्गाकुंड भागात कबीरनगर येथे वास्तव्यास होते. तेथेच त्यांचा आश्रम आहे.

बाबा शिवानंद यांनी आपले संपूर्ण जीवन योग साधनेत समर्पित केले. ते अत्यंत साधे आयुष्य जगले. आयुष्यभर ब्रह्मचर्य पाळले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर पोस्ट शेअर करून शिवानंद बाबा यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले. २१ मार्च २०२२ ला शिवानंद यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## आज बारावी परीक्षा निकाल

### दुपारी एकपासून ऑनलाईन उपलब्ध

पुणे | वृत्तसंस्था

इयत्ता बारावीच्या फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ उद्या (दि.५) जाहीर करणार आहे. मंडळाने याबाबत आज अधिकृत घोषणा केली. निकाल जाहीर होणार असल्याने लाखो विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांची धाकधूक वाढली आहे. विद्यार्थ्यांना त्यांचा निकाल उद्या दुपारी १ वाजेपासून ऑनलाईन पाहता येणार आहे.

#### येथे निकाल पाहता येणार

- mahahsscboard.in
- mahresult.nic.in
- hscresult.mkcl.org
- msbshse.co.in
- mh-ssc.ac.in
- sscboardpune.in
- sscresult.mkcl.org
- hsc.mahresults.org.in

यंदा बारावीची परीक्षा दरवर्षीपेक्षा १० दिवस लवकर पान १० वर >>>

# पंच्याण्णव दिवसांत नाशकात वीस खून

## सव्वीस विधिसंघर्षित मुलांचा सहभाग निष्पन्न

नाशिक | भारत पगारे

नाशिक शहरात बकासूर, रावण, मॅडी, पॅडी व अशीच काहीतरी विशेषणे जोडून सोशल मिडियावर 'रीलगिरी' करणाऱ्या अल्पवयीन मुलांनी गुन्हेगारी प्रवृत्ती जोपासण्याचे प्रयत्न सफल केले आहेत. कारण, जानेवारी ते ४ एप्रिल २०२५ या ९५ दिवसांत खुनाच्या २० घटना घटना घडल्या आहेत. त्यामध्ये २६ विधिसंघर्षित बालकांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

यात कौटुंबिक कलहातून झालेले खून वगळता सराईत गुन्हेगार व अवैध व्यवसाय करणाऱ्यांनी विधिसंघर्षितांच्या मदतीने केलेल्या खुनांची संख्या जास्त आहे. विशेष म्हणजे कबुतरबाजी व हद्दीच्या वादासह बदला घेण्यासाठी काही विधिसंघर्षितांनी मित्रांची हत्या केल्याचे समोर आले आहे.

शहरात मालाविरुद्धची गुन्हेगारी कमी नसतानाच शरीराविरुद्धची गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात फोफावत चालल्याचे चित्र गेल्या ९ महिन्यांत वाढले आहे. अल्पवयीन मुले गुन्हेगारीचे उदात्तीकरण करीत आहेत. शहरातील विविध पानटपऱ्या व वाइनशॉपबाहेर ही मुले सिगारेटचे झुरके मारण्यासोबतच लालेलाल 'फुलचंद' चावताना दिसत आहेत. त्यातील अनेक जण मद्याच्या आहारी गेले आहेत. स्थानिक राजकारणी, नेते, पदाधिकारी, काही संस्था व संघटनांच्या व्हाईट कॉलर संशयितांनी या अल्पवयीनांना क्षुल्लक अर्थ व मद्यपुरवठा केल्याने ते सताड आणि नको त्या ठिकाणी बिनधास्त मुजोरी करताना दिसत आहेत. या मुलांना अंकुश कसा लावायचा, यादृष्टीने शासन काहीसे प्रयत्न करीत असताना १३ ते साडेसतरा वयोगटातील विधिसंघर्षित मुले आपले गुन्हेगारी इप्सित साध्य करीत आहेत. वयामुळे कायद्याचे संरक्षण व गुन्हा केल्यानंतर मिळणारी सहानूभुती या कारणास्तव गुन्हेगारीशिवाय या मुलांना काही दिसेनासे झाल्याची स्थिती नाशिकमध्ये आहे.



#### विधिसंघर्षितांचे काही गुन्हे

'एकमेकांच्या परिसरात यायचे नाही व भाईगिरी दाखवायची नाही' या वादातून उद्भवलेल्या अल्पवयीनांच्या दोन टोळ्यांनी महिनाभरात दोघांचे खून केले. विधिसंघर्षित अरुण राम बंडी याचा अल्पवयीनांसह टोळक्याने ८ मार्चला संत कबीरनगरात निर्घृण खून केला. याच खुनाचा बदला घेण्यासाठी काही विधिसंघर्षितांनी बंडीच्या खुनात सहभागी करण चौरे या विधिसंघर्षिताचा २८ एप्रिलला कामटवाडे गावात भरदिवसा एकटे गाठून खून केला होता.

#### ठळक मुद्दे

- प्राणघातक हल्ल्यांच्या घटनांत वाढ.
- खुन्नस, भाईगिरी, नशा व पैशांच्या वादातून खून.
- पिस्तुलाचा धाक दाखवून लुटीसारख्या गुन्ह्यात सहभाग.
- एकलकोंडेपणामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ.

#### कबूतरबाजीतून खून

इंदिरानगरात १४ एप्रिलच्या रात्री अल्पवयीनांनी सुरु केलेल्या कबूतरबाजीच्या वादातू राम उर्फ रामदास नारायण बोराडे या वीस वर्षीय तरुणाचा पाच मुख्य संशयितांसह तिघा विधिसंघर्षित बालकांनी खून केला होता. तर एकावर प्राणघातक हल्ला केला होता.

# शेतमाल निर्यातवाढीला 'अपेडा'कडून बळ

## धोरण आखणी सुरू; चिंतन शिबिरात माहिती

नवी दिल्ली | वृत्तसंस्था

भारतातील शेती उत्पादने आणि प्रक्रियायुक्त अन्नपदार्थांच्या निर्यातीत वाढ करण्यासाठी 'अपेडा'कडून विकासात्मक धोरणाची आखणी सुरू आहे, असे वाणिज्य विभागाचे सचिव सुनील बर्थवाल यांनी सांगितले.

कृषी आणि प्रक्रिया केलेली अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाने (अपेडा) आज येथील वाणिज्य भवन येथे एक चिंतन शिबिर आयोजित केले. त्यावेळी बर्थवाल बोलत होते.

भारतातील शेती उत्पादने आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांचा बाजारपेठेतील प्रवेश सुलभ व्हावा. तसेच, त्यासाठीचा खर्च कमी करण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध आहे, असेही बर्थवाल यांनी सांगितले.

वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश अग्रवाल यांनी भारताच्या कृषी निर्यात क्षमतेला प्रत्यक्षात साकार करण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, उद्योग भागधारक आणि शेतकरी समुदायांमधील समन्वयात्मक प्रयत्नांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर दिला.

केंद्र सरकार, राज्य सरकारे, उद्योजक आणि संबंधित मंत्रालयातील अधिकारी अशा प्रतिनिधींनी शिबिरात संवाद साधला. शिबिरात बासमती आणि बिगर बासमती तांदूळ, प्राणीजन्य उत्पादने, बागायती, प्रक्रिया केलेले अन्न, सेंद्रिय उत्पादने आदी क्षेत्रांवर भर देण्यात आला.

